लोकमत



पदवीदान समारंभाला उपस्थित जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटीचे सचिव किशोर दर्डा, तंत्रशिक्षण संचालक डॉ.डी.व्ही. जाधव, बँक प्रबंधक अनुप कुमार, प्रभारी प्राचार्य डी.एन. चौधरी आदी

# कठोर परिश्रमातून यशाचे शिखर सर करा

## डी.व्ही. जाधव : जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवीदान समारंभ, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** आजचे युग स्पर्धेचे आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंगी असलेली कल्पकता, जिज्ञासा आणि कठोर परिश्रम व प्रयत्नांची पराकाष्ठा करून यशाचे शिखर पादाक्रांत करावे, असे प्रतिपादन अमरावती विभागाचे तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ. डी.व्ही. जाधव यांनी केले.

येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयात ग्रॅज्यूएशन सेरेमनीप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. जवाहरलाल दर्डा एज्यूकेशन सोसायटीचे सचिव किशोर दर्डा अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणन बँक ऑफ इंडिया यवतमाळ शाखेचे मुख्य प्रबंधक अनुपम कुमार, जेडीआयईटीचे प्रभारी प्राचार्य डॉ.डी.एन. चौधरी उपस्थित होते.

डॉ. डी.व्ही. जाधव म्हणाले, यवतमाळसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षण क्षेत्रात घेतलेली उत्तुंग व नेत्रदीपक भरारी अभिमानास्पद आहे. यावेळी त्यांनी आपल्या आई-वडिलांप्रती सतत माया ठेऊन कृतज्ञ राहावे, असा सल्ला दिला.

अध्यक्षीय भाषणात किशोर दर्डा यांनी महाविद्यालयाची परंपरा, विद्यार्थ्यांची गणवत्ता. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाप्रती असलेले सलोख्याचे संबंध या सर्व कौटुंबिक जिव्हाळ्याची यथासांग उकल केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उमाकांत कोंगरे यांनी केले. संचालन व आभार प्रा. मोहित पोपट यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे विद्यार्थी, पालक, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



विद्यार्थिनीचा सत्कार करताना डॉ.डी.व्ही. जाधव, संस्थेचे सचिव किशोर दर्डा, डॉ.डी.एन. चौधरी आदी.

### प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव

सत्र २०१८-१९ आणि २०१७-१८ मधील विशेष प्रावीण्य प्राप्त २८ विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात उत्कृष्ट पदावर कार्यरत असलेल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचाही ग्रॅज्यूएशन सेरेमनीमध्ये सत्कार करण्यात आला.